# देगलूर महाविद्यालयातील खेळाडूचा आंतर विद्यापीठ मैदानी स्पर्धेत सहभाग

देगलूर- मंगलोर विद्यापीठ, मंगलोर, कर्नाटक येथे होणाऱ्या आंतर विद्यापीठ मैदानी स्पर्धेसाठी स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ,नांदेडच्या संघात देगलूर महाविद्यालयाचा खेळाडू अनिल हेमनर याची १०० मी व २०० मी धावणे स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

स्पर्धेसाठी अनिल हेमनर याला प्रशिक्षक म्हणून डॉ.निरजकुमार उपलंचवार यांचे मार्गदर्शन लाभले. या खेळाडूंचे अभिनदंन आडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, संस्थेचे सचिव शशिकांत चिद्रावार, नारायणराव मैलागीरे, सुर्यकांत नारलावार, विलास तोटावार व कार्यकारिणी मंडळ सदस्य राजकुमार महाजन, डॉ कर्मवीर उंग्रतवार, देवेंन्द्र मोतेवार, गंगाधर जोशी, जनार्दन चिद्रावार, रविंद्र घाडे, चंद्रकांत नारलावार, प्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य निवृती गोविंदवार, डॉ. बी. आर. कत्तुरवार, पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी यांनी आभिनंदन केले आहे.